**ठळक बातम्या**

- पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी संरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि सेना दल प्रमुखांची महत्त्वाची बैठक, तर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची विरोधी पक्षनेत्यांची मागणी
- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या, महाराष्ट्रातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या गुंतवणुकीसाठीच्या युग्म परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणूक निकालात लिबरल पार्टीला निर्णायक आघाडी / मार्क कार्नी देशाचे प्रधानमंत्री म्हणून कायम राहण्याची शक्यता

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, श्रीलंकेत सुरु असलेल्या तिरंगी मालिकेत भारताचा दक्षिण आफ्रिकेवर १५ धावांनी विजय

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल, सेनाप्रमुख सीडीएस अनिल चौहन तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. तसं पत्र त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे.

दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दर्शवण्यासाठी आणि मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलावावं, असं पत्रात म्हटलं आहे.

काँग्रेसच्या या मागणीवर भाजपानं टीका केली आहे. ही वेळ चर्चा करण्याची नसून पाकिस्तानला धडा शिकवण्याची असल्याचं ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. काँग्रेसनं या संदर्भात आधी आपली भूमिका स्पष्ट करावी असं आवाहन भाजपा प्रवक्ता शहजाद पूनावाला यांनी केलं आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरलं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली.

**होल्ड बाईट…फडनवीस**

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत पहलगाम हल्ल्यातल्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसंच त्यांच्या कुटुंबियांना शिक्षण आणि रोजगारासाठी मदत करणार असल्याचंही सरकारनं सांगितलं. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे यांना सरकारी नोकरी देण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

**<><><><><>**

शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रात देशाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि त्याला चालना देण्यासाठी, भारताची संशोधन परिसंस्था मजबूत करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकसित भारतासाठी शिक्षण, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्राला एकत्रित आणणाऱ्या युग्म संमेलनात ते बोलत होते. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं हे संमेलन होत आहे. या तिनही क्षेत्रात सरकार

करत असलेल्या कामांची, आणि भविष्यातल्या योजनांची माहिती मोदी यांनी यावेळी दिली. युग्म अर्थात - Youth, University, Government, and Market, हा एक प्रकारचा पहिलाच धोरणात्मक मंच असून, यात सरकार, शिक्षण, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्रातलं नेतृत्व एकत्र येत आहे.

**<><><><><>**

वेव्हज् २०२५ परिषद परवापासून मुंबईत सुरु होत आहे. या परिषदेमुळे देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं आहे. वेव्हजच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयंउद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळे खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी यासंदर्भातल्या लेखात व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

वेव्हज २०२५ या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणामुळे,  रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारीत होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्रं उद्यापासून ४ मे पर्यंत रात्री साडेआठ वाजता प्रसारीत होईल. बातमीपत्राच्या वेळेतला हा बदल ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीपुरताच आहे.

**<><><><><>**

कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणूक निकालात लिबरल पार्टीनं निर्णायक आघाडी घेतली असून मार्क कार्नी देशाचे प्रधानमंत्री म्हणून कायम राहतील हे स्पष्ट झालं आहे. लिबरल पार्टीनं १६८ जागांवर आघाडी घेतली आहे,  बहुमतासाठी त्यांना १७२ जागा जिंकणं गरजेचं आहे. लिबरल पार्टीला बहुमताचा आकडा गाठता आला नाही तर त्यांना इतर पक्षाचा पाठिंबा घ्यावा लागेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना ते कधीही शक्य होणार नाही असं मार्क कार्नी विजयी सभेला संबोधित करताना म्हणाले.

**प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनी लिबरल पार्टीच्या विजयाबद्दल मार्क कार्नी यांचं अभिनंदन केलं आहे. लोकशाही मूल्य, कायद्याच्या राज्याबद्दलची वचनबद्धता हा भारत आणि कॅनडा यांच्यातला समान दुआ आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

त्रिनिदाद आणि टोबॅगोमधल्या निवडणुकांमध्ये विजय मिळल्याबद्दल कमला प्रसाद बिस्सेसर यांच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. त्रिनिदाद आणि टोबॅगोसोबत भारताचे पूर्वापार घनिष्ठ संबध आहेत आणि भारताला त्याचा अभिमान आहे. असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, श्रीलंकेत सुरु असलेल्या तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर १५ धावांनी विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, आणि निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २७६ धावा केल्या. प्रतिका रावळनं ७८, तर कर्णधार हरमनप्रित कौरनं नाबाद ४१ धावा केल्या. जेमिमा रॅाड्रिग्जनं ४१ धावांचं योगदान दिलं.

दक्षिण आफ्रिकेला हे आव्हान पेलता आलं नाही. तजमिन ब्रिक्सनं १०९ धावांची दमदार खेळी केली. मात्र इतर फलदांजांना चांगली कामगिरी करता आली नाही, त्यामुळे सामन्यातले चार चेंडू बाकी असतानाच दक्षिण आफ्रिकेचा डाव २६१ धावांवर आटोपला. भारतातर्फे स्नेह राणानं ५ बळी घेतले. तीच या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्लीमधे दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या ७व्या षटकात २ बाद ८५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

उत्तराखंडमधील चार धाम यात्रेची उद्यापासून  सुरुवात होणार आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे उघडून ही सुरुवात करण्यात येईल. उत्तराखंड सरकारने यात्रेसाठी आवश्यक असलेली सर्व तयारी पूर्ण केली आहे. केदारनाथ धामचे दरवाजे येत्या २ मे ला  तर  बद्रीनाथ धामचे दरवाजे ४ मे ला  उघडणार आहेत.

**<><><><><>**

दिल्ली, मुंबई, कोलकाता, मोहाली आणि चंदीगड मधे विकसक आणि बँक यांच्यातल्या साट्यालोट्याची प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला दिले आहेत. प्राथमिक चौकशी करून विशेष तपास पथकाची स्थापना करायला न्यायालयानं सीबीआयला सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली ही चौकशी होणार असून दर महिन्याला या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. न्यायालयानं सीबीआयला अंतरिम स्थिती अहवाल सादर करायलाही सांगितलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर काश्मीर खोऱ्यातली  ४८ पर्यटन स्थळं पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जम्मू कश्मीर सरकारने घेतला आहे. खोऱ्यात एकूण ८७ पर्यटनस्थळं आहेत. इतर स्थळांना योग्य सुरक्षा पुरवल्याचं सरकारनं म्हटलं आहे. पहलगाम ह्ल्ल्यानंतर काश्मीरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या घटली आहे. श्रीनगर विमानतळावरची प्रवाशांची वर्दळही कमी झाली आहे.

***//<><><><><>//***